ARTHA
Poona 4.

Reg. No. B. 3434. Licence No. 53
Licenced to post without prepayment

अर्थशास्त्र, व्यापार, उद्योगधंदे, बँकिंग, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें एकमेव मराठी साप्ताहिक
स्थापना : १९३५

# अर्थ

" अर्थ एव प्रधानः " इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक बुधवारीं प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : २ आ.
दुर्गाधिवास, पुणें ४.

वर्ष १८ | पुणें, बुधवार तारीख ५ नोव्हेंबर, १९५२ | अंक ४१

## विविध माहिती

**बिर्ला दोन नवीन कारखाने चालविणार**—हैद्राबाद सरकारच्या मालकीचे दोन कारखाने बिर्ला बंधू चालविण्यास घेणार आहेत. त्यांपैकी एक कारखाना रेशमाचा असून दुसरा कागदाचा आहे. हैद्राबाद सरकारच्या ह्या योजनेला मध्यवर्ती सरकारची अनुमति मिळाल्यासारखीच आहे.

**बिगर-परवाना रेडिओवाल्यांना शिक्षा**—१९५२ च्या जानेवारी ते मार्च महिन्याअखेर ५८ जणांना बिगर-परवाना रेडिओ वापरल्याबद्दल शिक्षा झाली. त्यांपैकी २२ जण पंजाबमधील, १३ जण मुंबई भागांतील, १२ जण मद्रास भागांतील, ४ प. बंगालमधील, आसाममधील ३ आणि उत्तर प्रदेशांतील १ असे होते.

**विद्यार्थ्यांसाठी दंतशाळा**—नागपूर विद्यापीठाच्या आरोग्य-मंडळाच्या १९५१–५२ सालच्या अहवालांत असें नमूद करण्यांत आलें आहे कीं, तपासलेल्या विद्यार्थ्यांमध्यें दात व डोळे रोगट आढळून आले. विद्यार्थ्यांच्या दातांच्या आरोग्यासाठी एक दंतशाळा विद्यापीठानें उघडावी, अशी शिफारस मंडळानें केली आहे.

**जबलपूरच्या स्टेशनाची दुरुस्ती**— जबलपूर स्टेशनच्या इमारतीची दुरुस्ती करण्यासाठी २४ लाख रुपयांची एक योजना आखण्यांत आली आहे. नव्या स्टेशनचा प्लॅटफॉर्म पहिल्यापेक्षा १०० फूट लांब आणि २० फूट रुंद ठेवण्यांत येणार आहे. त्याशिवाय प्रवाशांसाठी कांहीं अधिक सोयीहि करण्यांत येणार आहेत.

**निर्वासितांसाठी शहर**— भोपाळजवळ ८ मैलांवर असलेल्या भैरवगड ह्या ठिकाणीं निर्वासितांची एक छावणी आहे. ह्या छावणीचें रूपांतर कायमच्या शहरांत करण्यासाठी भारतीय सरकारनें २४ लाख रुपये मंजूर केले आहेत. शहराचा विस्तार ६०० एकर होईल आणि त्यांत १०,००० सिंधी निर्वासितांसाठी २,००० नवीन घरें बांधण्यांत येतील.

**त्रावणकोर बंदरांत दीपगृह**—त्रावणकोर बंदरांत ४० फूट उंचीचें एक दीपगृह बांधण्याची योजना मध्यवर्ती सरकारनें तांतडीची म्हणून मजूर केली आहे. धातुमिश्रित वाळूंची निर्यात होऊं लागल्यापासून बंदराला महत्त्व आलें आहे.

**या व उद्योगधंदे काढा**—मध्य-भारतांत नवीन उद्योगधंदे काढण्यास राज्य-सरकारच्या उद्योगखात्याची परवानगी घेण्याचें ह्यापुढें कारण नाहीं, असें मध्य-भारत सरकारनें जाहीर केलें आहे.

**१,६६० ट्यूब वेल्स**—उत्तर-प्रदेश सरकारनें राज्यांतील पाटबंधाऱ्यांची सोय वाढविण्याचा १५ वर्षांचा कार्यक्रम आखला आहे. ह्या कार्यक्रमाच्या पहिल्या पांच वर्षांत १,६६० ट्यूब वेल्स खोदण्याचा सरकारचा संकल्प आहे. ह्या योजनेवर एकूण सुमारें ७० लाख रुपये खर्च करण्यांत येणार आहेत.

**विशाखापट्टणला तेलाचा कारखाना**—भारताच्या पूर्व-किनाऱ्यावर विशाखापट्टण येथें तेल शुद्ध करण्याचा एक कारखाना काढण्याची तयारी काल्टेक्स ह्या अमेरिकन कंपनीनें दाखविली आहे. कारखान्याच्या उभारणीचे कामास १९५४ सालीं प्रारंभ होईल. वाटाघाटी मात्र लवकरच सुरू होणार आहेत.

**हुबळीला लॉ कॉलेज**—श्री. गुरुसिद्धेश्वर स्वामी ह्यांनीं हुबळी येथें लॉ कॉलेज स्थापन करण्यासाठी ५०,००० रुपयांची देणगी जाहीर केली आहे. त्यांनीं आतांपर्यंत ४ लाख रुपये निरनिराळया संस्थांना देणगीच्या रूपानें दिले आहेत. कर्नाटकांतील पुष्कळ संस्थांना ह्या दानशूर स्वामींच्या औदार्याचा लाभ झालेला आहे.

**डॉक्टरांना परदेशी शिक्षण**—इंडिअन मेडिकल असोसिएशनतर्फे पुढील वर्षी १०० डॉक्टर्सना इस्पितळांत काम करून खास अनुभव घेण्यासाठी त्यांना परदेशीं पाठविण्यांत येईल असें समजतें.

**हिंदी इतिहास-परिषद्**—हिंदी इतिहास-परिषदेचें येतें अधिवेशन ग्वाल्हेर येथें ता. २८ ते ३० डिसेंबरपर्यंत भरणार असून त्यासंबंधीं पूर्वतयारी करण्याचें काम चालू झालें आहे. ह्या परिषदेचें अध्यक्षस्थान प्रो. राधाकुमुद् मुकर्जी ह्यांनीं स्वीकारलें आहे.

**पूर्व बंगालसाठी जपानी इंजिनें**—तेलावर चालणारीं दहा रेल्वे एंजिनें पूर्व-बंगाल सरकारनें जपानकडून आयात केलीं आहेत. आणखी १५ रेल्वे एंजिनें डिसेंबर महिन्यांत चितगांव बंदरांत येतील. हीं सर्व एंजिनें पूर्व-बंगाल रेल्वेवर वापरण्यांत येणार आहेत.

**सौंदर्यप्रसाधनांचा धोका**—ब्रिटनमधील सुप्रसिद्ध वैद्यकीय मासिक 'लान्सेट' ह्यांत असें मत व्यक्त करण्यांत आलें आहे कीं, सौंदर्यप्रसाधनें वापरल्यानें त्वचा रोग होण्याचा धोका असतो. ओष्ठ शलाका, नखांचा रंग, सेंट व अत्तरें इत्यादींचा समावेश सौंदर्यप्रसाधनांत करण्यांत आला आहे. भारीत भारी अत्तरें वापरलीं तरी सुद्धां धोका टळत नाहीं असें मत व्यक्त करण्यांत आलें आहे.

## साखरतज्ज्ञांची भेट

पुणें येथें भरलेल्या साखरतज्ज्ञांच्या सभेस आलेल्या प्रतिनिधींनीं महाराष्ट्र औद्योगिक संग्रहालयाचे निरनिराळ्या भागांना भेट दिली. त्यांना संग्रहालयासंबंधीं माहिती देऊन शेती-संग्रहालय, सरकार, जनता, विद्यार्थी व संशोधक या प्रत्येकांकरितां संग्रहालय काय काय करतें तें सांगितलें. श्री. घारपुरे यांनीं म्युझियम ऍज्युकेशन असोसिएशनची माहिती सांगितली व हिंदी कलाकौशल्याची माहिती सांगितली. कॉमन्वेल्थमध्यें पाहुण्यांना बृहन्महाराष्ट्र शुगर सिंडिकेटचे मॅनेजिंग एजंट व संग्राहालयाचे एक विश्वस्त, श्री. चं. गो. आगाशे, यांनीं अल्पोपहार दिला.

---

**कै. दि. ब. काजी—मध्यप्रदेश को. बँकेची आदरांजलि.**

"दि. ब. एच्. एल्. काजी ह्यांच्या निधनाबद्दल मध्यप्रदेश को. बँक लि च्या नोकरवर्गास अत्यंत दुःख होत आहे. दि. ब. काजी हे सहकारी चळवळीचे निःसिम भक्त होते आणि मुंबई राज्यांतील सर्व प्रमुख सहकारी संस्थांशीं त्यांचा घनिष्ठ संबंध होता. दि ब. काजींच्या कुटुंबियांच्या दुःखांत बँकेचा नोकरवर्ग सहभागी आहे."

**इंडियन न्यूजपेपर्स को. सोसायटीचे अध्यक्ष, श्री आ. रा. भट**

इंडियन न्यूजपेपर्स को. सोसायटीच्या संचालक मंडळावर श्री. आ. रा. भट ह्यांना घेण्यांत आलें असून त्यांची १९५२-५३ सालाकरितां अध्यक्ष म्हणून निवडणूक करण्यांत आली आहे.

---


## WANTED

Applications are invited for the post of the Manager in the time scale of Rs. 200-20-400 plus Dearness Allowance as sanctioned from time to time.

Graduates in Commerce or with Economics having previous experience in Co-operative Banking and other recognised Banking Qualifications only need apply with particulars of their age, qualifications and experience.

Selected candidate will have to join immediately and will be on probation for six months. Knowledge of Marathi essential.

Candidates called for interview will have to appear at their own cost.

Applications should be addressed to the undersigned by name and should reach him on or before 10th November 1952.

No correspondence will be entered into in respect of unselected applicants.

The applicants are advised to send their applications by Registered Post Acknowledgement Due as no separate acknowledgement will be given.

**M. V. RABADE,**
Managing Director.

Dated, 30-10-1952.
The Poona Central Co-op. Bank, Ltd.,
Laxmi Road, Poona 2.
Post Box No. 511.



# मध्यप्रदेश
# को-ऑपरेटिव्ह बँक लि.

स्थापना-१९११

**हेड ऑफिस—नागपूर शहर (टिळक पुतळयाजवळ)**

**अध्यक्ष—सर माधवराव देशपांडे, के. बी. ई.**

मध्यप्रदेशांतील सहकारी चळवळीच्या केन्द्रस्थानीं असलेली व कित्येक वर्षे लोकादरास व ठेवीदारांच्या विश्वासास पात्र झालेली

**एकमेव प्रादेशिक सहकारी बँक**

शाखा : सिताबर्डी-नागपूर, अमरावती, खामगांव, मलकापूर, बुलढाणा, चांदा, बैतूल, इटारसी, हरदा, पिपारिया, नरसिंगपूर, जबलपूर, मंडला व राजनांदगांव.

★

| | |
|---|---|
| अधिकृत हिस्से-भांडवल | रु. २०,००,००० |
| जमा झालेलें हिस्से-भांडवल | रु. १०,९७,००० |
| गंगाजळी | रु. १४,५१,००० |
| एकूण ठेवींची रक्कम | रु. २,१५,५५,००० |
| सरकारी रोखे | रु. ७२,९१,००० |

**खेळतें भांडवल रु. ३ कोटींचे वर.**

आर्थिक दृष्ट्या पूर्ण सुरक्षित.
आकर्षक व्याजाचे दर.
सर्व प्रकारच्या ठेवी स्वीकारण्यांत येतात
— व —
इतर सर्व बँकिंगचे व्यवहार करण्यांत येतात.

★

मागील सहा वर्षांपासून हिस्स्यांवर ५ टक्के "इन्कमटॅक्स माफ" मुनाफा वांटण्यांत येत आहे.

**आपल्या मूल्यवान् वस्तू व दागिने आमच्या "सेफ डिपॉझिट व्हॉल्ट" मध्यें ठेवून निर्धास्त व्हा.**

वैयक्तिक तिजोऱ्यांची (Lockers) व्यवस्था केली आहे.

सविस्तर माहिती समक्ष भेटींत अथवा पत्रद्वारें

★

**नि. स. देव,**
मॅनेजर.

# अर्थ

बुधवार, ता. ५ नोव्हेंबर, १९५२



संस्थापक :
प्रो. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे


## बँकिंगच्या प्रसारासाठीं अभिनव प्रयत्न

पुणें बँकिंग असोसिएशननें तिच्या कार्याच्या प्रगतीचें आणखी एक पाऊल म्हणून चालू महिन्याच्या शेवटचे आठवड्यांत एक व्याख्यानमाला व बँकिंगविषयक प्रदर्शन ह्यांची योजना केली आहे. बँकिंग क्षेत्रांतील तज्ज्ञ मंडळींच्या चर्चेचा व मार्गदर्शनाचा लाभ त्या व्याख्यानांचे द्वारां संबंधित लोकांना होणार आहे. अशीं व्याख्यानें एकाद्या विशिष्ट हेतूनें व योजनापूर्वक करण्यांत विशेष महत्त्व आहे. बँकिंगविषयासंबंधीं प्रदर्शनाची कल्पना तर अगदीं नवीन आणि उपयुक्त आहे. तिचेविषयीं तपशील ह्याच अंकांतील शेवटच्या पृष्ठावरील माहितींत दिला आहे. हें प्रदर्शन यशस्वी व नाविन्यपूर्ण करण्याचा असोसिएशनचा कसून प्रयत्न चालू आहे. त्यासाठीं भारत इतिहास संशोधन मंडळ, सहकारी खात्याचे रजिस्ट्रार, सेव्हिंग्ज स्कीमचे अधिकारी, ह्यांचें सहकार्य मिळविण्यांत येत आहे आणि ठिकठिकाणच्या बँकांनींहि सहाय्य देऊं केलें आहे. ह्या बाबतींत आर्थिक मदतहि जरूर असून, कित्येक बँकांनीं ती आपण होऊन देऊं केली आहे. सर्व बँकांनीं ह्या कामीं पुढें येऊन शक्य तें सहकार्य करणें त्यांच्याच अंतिम हिताचें आहे. कोणत्याहि एकाद्या विशिष्ट संस्थेचा प्रचार करण्याचा येथें हेतु नसून सर्वांच्या सारख्याच जिव्हाळ्याच्या अशा बँकिंगसंबंधीं समाजांत इष्ट त्या ज्ञानाचा व माहितीचा प्रसार करण्याचा हा प्रश्न आहे. त्यांत शेड्यूल्ड–बिगर शेड्यूल्ड, जॉइंट स्टॉक–सहकारी, अर्बन–खेडेगांवी, सरकारी–खाजगी, पुणें–बिगर पुणें, असा कोणत्याहि प्रकारचा भेद नाहीं; सर्वांच्याच इष्ट प्रगतीसाठीं सहकार्य करण्याची ही संधि आहे. पुणें बँकिंग असोसिएशनच्या प्रस्तुत उपक्रमास बँकिंग क्षेत्रांतील व्यावसायिक लोक स्वयंस्फूर्तीनें हातभार लावतील आणि त्यांतून आणखी पुढचें पाऊल पडण्यास उत्साह वाटेल, अशी आम्हांस आशा आहे. जनतेस काटकसर करण्यास लावून तिची बचत राष्ट्रोपयोगी योजनांस उपलब्ध करून देण्याची महत्त्वाची कामगिरी बँका अधिक चांगल्या रीतीनें करूं लागल्या, म्हणजे आपल्या आर्थिक उद्धारास योग्य वळण लागल्याविना रहाणार नाहीं. ह्या दृष्टीनें प्रस्तुत उपक्रमाकडे पाहिलें, म्हणजे त्याचें राष्ट्रीय महत्त्व सहज पटण्याजोगें आहे. पुणें बँकिंग असोसिएशननें ह्याबाबत चालविलेली खटपट कौतुकास्पद आहे.

## महाराष्ट्रांतील बँकिंगचा विकास

"अर्था" च्या दिवाळी अंकांत श्री. चिं. वि. जोग ह्यांनीं एक लेख लिहून, महाराष्ट्रीय नियामक मंडळांखालील आठ शेड्यूल्ड बँकांच्या एकत्रीकरणाची कल्पना स्वयंप्रेरणेनें मांडली. आज प्रत्येक महाराष्ट्रीय बँक व्यक्तिशः लहान आहे आणि मोठ्या बँकांस यशस्वी तोंड देण्याची कुवत कुठल्याहि बँकेंत नाहीं; तेव्हां आठहि बँकांचें एकत्रीकरण झाल्यास मोठमोठ्या धंद्यांच्या वाढीसाठीं आवश्यक असें कर्ज मिळूं शकून महाराष्ट्राची सर्वांगीण औद्योगिक उन्नति होण्यास हातभारच लागेल असें त्यांनीं प्रतिपादन केलें. बिगर–शेड्यूल्ड बँकांनींहि हा प्रश्न विचारांत घेण्याजोगा आहे असें सांगून त्यांच्या सूचनेचा संबंधीं लोकांनीं विचार करावा अशी त्यांनीं आग्रहाची विनंति केली. श्री. जोग ह्यांच्या लेखानें अपेक्षित अशा वैचारिक देवघेवीस व चर्चेस बँकिंग क्षेत्रांतील व्यवहारी मंडळींत प्रारंभ झालेला दिसतो. "अर्था"-कडे महाराष्ट्रीय बँकिंगशीं निकट संबंध असलेल्या कांहीं अनुभवी तज्ञांनीं आपले विचार लेखांचे द्वारा प्रसिद्धीसाठीं पाठविले आहेत, ते "अर्था"मध्यें प्रसिद्ध होतीलच. बँका-बँकांतून अधिक सहकार्य असावयास पाहिजे, ह्याबद्दल त्यांपैकीं कुणाचेंच दुमत नाहीं; परंतु इष्ट हेतु एकत्रीकरणामुळेंच साध्य होईल काय आणि एकत्रीकरणाच्या कठीण उपायापेक्षा अधिक सोप्या उपाययोजनेनें काम भागणार नाहीं काय, असा प्रश्न उपस्थित करण्यांत आला असून त्याबाबत मोकळेपणानें चर्चाहि करण्यांत आली आहे. अशा तऱ्हेची, उच्च भूमिकेवरील चर्चा करण्यास व्यवसायी तज्ञ पुढें येत आहेत, हें प्रगतीचें निश्चित लक्षण आहे. ह्याविषयींचे सर्व लेख वाचून त्यांपासून बोध काढणें व घेणें हें त्या व्यवसायांतील नेत्यांचें काम आहे. एकत्रीकरण दूर राहिलें, तरी बँकांच्या प्रभावी सहकार्यास प्रस्तुत लेखमाला प्रवृत्त करील, अशी आम्हांस आशा आहे.

## कचऱ्यांतून संपत्ति निर्माण करणारा जपान

दिल्ली शहरांत ठिकठिकाणीं गंजलेल्या लोखंडाच्या सामानाचे व टिनचे ढीग पडलेले होते. हा सर्व कचरा आतां जपानी उद्योगधंद्यांना कच्चा माल पुरविण्यासाठीं म्हणून जपानला पाठविण्यांत येत आहे. आतांपर्यंत दिल्लीच्या नगरपालिकेला हा कचरा शहराबाहेर नेऊन टाकण्यासाठीं खर्च करावा लागत असे; पण आतां तो हलविण्याबद्दलच नगरपालिकेला मोठाल्या रकमा मिळूं लागल्या असून उत्पन्नाची एक नवीन बाबच सांपडली आहे. ह्या कचऱ्याच्या ढिगाऱ्यांचे लिलांव करण्यांत येतात. एका ठिकाणच्या कचऱ्याच्या लिलांवांत ४,००० रुपयेपर्यंत मागणी चढली होती. लिलांवांत कलकत्ता येथील कांहीं कंपन्याहि भाग घेत आहेत. दिल्लीमध्यें जे छोटे–मोठे कारखाने आहेत त्यांनीं कचरा म्हणून हा माल टाकून दिलेला आहे. गेल्या वर्षी कलकत्त्यामधील एका कंपनीनें दिल्ली राज्यांतील अशा प्रकारचा सर्व कचरा हलविण्यासाठीं १,००० रुपये देऊं केले होते. तेव्हां राज्यसरकारनें दिल्ली म्युनिसिपालिटीकडे ह्यासंबंधीं विचारणा केली. तेव्हांपासून कचरा हलविण्याचें काम करण्यासाठीं अनेक स्थानिक व्यापारी पुढें आले आहेत; आणि त्यांनीं किंमतीही बऱ्याच चढविल्या आहेत. कचऱ्यांतील टिनचे गठ्ठे बांधण्यासाठीं छोट्या हातयंत्रांचा उपयोग करण्यांत येत आहे. नंतर हे गठ्ठे रेल्वेनें कलकत्त्याला पाठविले जातात. तेथून बोटीनें जपानला पाठविल्यानंतर ह्याच कचऱ्यांतून जपान आपुलें पोलादाचें उत्पादन वाढवितो आणि यंत्रसामुग्री तयार करण्यासाठीं त्याचा उपयोग करतो.

## बँकांचें एकत्रीकरण

( लेखकः—एक व्यवहारी )

*आंतबट्टयाचा व्यवहार चालू ठेवण्यापेक्षा एकत्रीकरण श्रेयस्कर होय. पण, अखिल महाराष्ट्राची एकच बँक असावी, हें इष्ट नाहीं. बँकांच्या एकत्रीकरणानें जे लाभ मिळावयाचे, ते महाराष्ट्रीय बँकांच्या सहकार्यानेंहि साध्य करतां येण्यासारखे आहेत; शिवाय त्यामुळें निरनिराळ्या उद्योगधंद्यांस आर्थिक सहाय्याचे अधिक झरे मोकळे रहातील. निरनिराळ्या धोरणानें चाललेल्या, सुरक्षित मर्यादेंत असलेल्या बँकांनीं शक्य त्या सर्व बाबतींत सहकार्य करून आपआपल्या क्षेत्रांत त्यांच्या वाढीस मदत करणेंच परिणामीं श्रेयस्कर होईल.*

श्री. जोग यांनीं आपल्या लेखांत केलेली महाराष्ट्रांतील बँकांच्या एकत्रीकरणाची सूचना विचार करण्यासारखी आहे यांत शंका नाहीं. जेव्हां चलनवाढ सतत होत होती, तेव्हां नवीन बँका निघणें व त्या सर्वांस ठेवींचा पाठिंबा मिळणें अगदीं सहज शक्य होतें. आतां सरकारकडून चलनसंकोचनाचें धोरण आंखण्यांत आल्यानें एकंदर बँकांतील ठेवींची संख्या तितक्या प्रमाणांत आकुंचित होणें अपरिहार्य आहे. हें आकुंचन कांहीं एका मर्यादेपर्यंत मोठ्या बँकांना फारसें जाणवणारहि नाहीं, येऊन जाऊन त्यांचा लाभ थोडा कमी होईल, पण लहान बँकांवर ठेवी कमी होण्याचा परिणाम निश्चित होणारच. एकतर त्यांचा मूळचा लाभच तुटपुंजा, त्यांत वाढता खर्च कमी करण्याची शक्यता नसतांना उत्पन्न मात्र कमी झाल्यानें त्यांना व्यवहार चालू ठेवणें कठीण जाणार हें उघड आहे तेव्हां असा आंतबट्टयाचा व्यवहार चालूं ठेवून आपत्ति ओढवून घेण्यापेक्षा अशा बँकांनीं एकत्रीकरणाचा मार्ग अवलंबावा हें निश्चितच श्रेयस्कर.

तथापि, अखिल महाराष्ट्राची एकच बँक असावी हें म्हणणेंहि तितकेंसें श्रेयस्कर ठरणार नाहीं. नवीन नवीन बँका कां निघाल्या त्याचा थोडासा बारकाईनें विचार केल्यास हें लक्षांत येईल व कोणाहि विचारी माणसास पटेलहि.

व्यक्ति तितक्या प्रकृति, हें अबाधित सत्य आहे. वैयक्तिक महत्त्वाकांक्षा, पैशांचा सुकाळ, क्वचित प्रसंगीं स्वार्थ, स्थानिक अभिमान व इर्षा अशा अनेक गुण (?) समुच्चयांतून नवीन नवीन अनेक बँकांचा जन्म झालेला आढळून आला तरी कांहीं विशेष प्रकारची विचारसरणी, विशेष प्रकारचा ध्येयवाद, व त्याकरितां करावयास लागणाऱ्या त्यागांतूनहि कांहीं बँकांचा उगम झाला असल्याचें दृष्टीआड करून चालणार नाहीं. याप्रकारचें भांडवल पाठीशीं असलेल्या व व्यवहाराच्या दृष्टीनें आंतबट्टयाच्या न होण्याइतक्या आकाराच्या ( minimum economic units ) एकापेक्षा अधिक बँका असणें घातक तर ठरणार नाहींच पण देशाचें प्रगतीस पोषकच ठरेल. कारण, त्यामुळें अशा बँकांच्या विशिष्ट निरनिराळ्या धोरणामुळें देशांतील निरनिराळ्या आर्थिक क्षेत्रांतील अंकुरांस ( Different Branches in the economic field of the Country ) खतपाणी मिळून महाराष्ट्राच्या आर्थिक भराभराटीस उत्तेजनच मिळेल असें आम्हांस वाटतें. उदाहरण द्यावयाचें झाल्यास, पुण्यांतील कांहीं संस्थांचे देतां येईल. येथें कोणाचाहि उणेपण दाखविण्याचा अगर कोणाची जाहिरातबाजी करण्याचा उद्देश नाहीं. पण एकाच धोरणाचें संचालक-मंडळ असलेली महाराष्ट्रांत एकच एक बँक असती तर गेल्या सुमारें १५ वर्षांत महाराष्ट्रांत जे कांहीं नवीन कारखाने निघाले ते निघूंच शकले नसते. निघालेले वाढीस लागूं शकलें नसतें. तसेंच कांहीं जुन्या संस्था अडचणीच्या वेळीं आवश्यक त्या मदतीच्या अभावीं एकतर नामशेष झाल्या असत्या अगर परप्रांतीयांच्या हातांत गेल्या असत्या. भिन्न धोरणाच्या एकापेक्षा अधिक बँका होत्या म्हणूनच ही आपत्ति टळली. अशा विशिष्ट ध्येयानें निघालेल्या बँकांस जनतेचें अगर इतर क्षेत्रांतील बँकांचें अधिक सहाय्य मिळालें असतें तर त्यांनीं केलें त्यापेक्षाहि अधिक कार्य त्यांना करतां आलें असतें.

श्री. जोग यांनीं सुचविल्याप्रमाणें बँकांच्या एकत्रीकरणानें जे लाभ मिळावयाचे ते निरनिराळ्या महाराष्ट्रीय बँकांच्या सहकार्यानेंहि साध्य करतां येण्यासारखे आहे. फक्त परस्परांवर विश्वास, दुसऱ्याच्या कार्याबद्दल आदर व सहकार वृत्ति बँकांच्या चालकांत व संचालकांत असावयास हवी. मध्यंतरीं एका बँकेच्या अध्यक्षांनीं सूचना केली होती कीं, महाराष्ट्रांतील बँकांनीं एकत्रित दायित्वावर रिझर्व्ह बँकेकडून देण्यांत येत असलेल्या "बिल-डिस्काउंटिंग" चा लाभ मिळविण्याचा प्रयत्न करावा. रिझर्व्ह बँक सहजासहजीं ही गोष्ट कदाचित् मान्य करणार नाहीं, पण योग्य दिशेनें प्रयत्न केल्यास या प्रयत्नांत यश येणें अशक्य दिसत नाहीं, पण अद्याप या दिशेनें कोणी विचार करण्यासहि तयार असल्याचें दिसत नाहीं.

परस्पर सहकार्यानें शाखांचा पसारा कमी करून खर्च कमी करणेंहि शक्य आहे; त्याकरतांहि एकत्रीकरणच व्हावयास हवें असें नाहीं.

बँकांनीं केलेल्या शहाजोग व्यवहाराच्या तारणावर अडीअडचणींच्या वेळीं एकमेकांस मदत करण्याचें धोरण ठरविल्यास जवळ जवळ एकत्रित बँकेप्रमाणेंच खेळत्या भांवडलाचा जास्तींत जास्त उपयोग करून घेणेंहि शक्य होईल.

किंबहुना, एकत्रित बँकेपासून अपेक्षिले जाणारे सर्व लाभ एकापेक्षा अधिक बँकांच्या सहकार्यानेंहि मिळणें शक्य होऊन शिवाय प्रत्येक बँकेच्या आखीव मर्यादित धोरणांत राहूनहि निरनिराळ्या क्षेत्रांतील उद्योगधंद्यांस वा संस्थांस आर्थिक साहाय्याचे अधिक झरे मोकळे राहातील. एकच बँक करण्यानें मात्र हें साध्य होणें कठीण किंबहुना अशक्य होईल.

देशाच्या विस्ताराच्या दृष्टीनें, तसेंच लोकसंख्येच्या दृष्टीनें पाहिलें तरी महाराष्ट्रांत एकच बँक असावी हा आग्रह पटण्यासारखा नाहीं. इंग्लंडचा विस्तार संयुक्त महाराष्ट्रापेक्षा मोठा आहे असें म्हणतां येणार नाहीं. पण तेथेंहि ३-४ मोठ्या बँका आहेत. जर्मनींत, युद्धपूर्व कालांत, हुकूमशाहि अर्थव्यवस्थेंतहि नांव घेण्यासारख्या तीनचार बँका होत्या. कॅनडाचा विस्तार मोठा आहे पण लोकसंख्या व आर्थिक व्यवहार त्या मानानें बेताचा. पण तेथेंहि ४ मोठ्या बँका आहेत व त्यांची चढाओढ भरपूर असूनहि परस्पर सहकार्य वाखाणण्यासारखें आहे.

याचा अर्थ असा नव्हे, कीं आम्हीं बँकांच्या एकत्रीकरणाच्या विरुद्ध आहों. आंतबट्टयाचा व्यवहार असतांनाहि सवतासुभा ठेवून बुडण्यापर्यंत पाळी आणण्यापेक्षा वेळींच दुसऱ्या बँकेंत विलीन होण्यांतच शहाणपणा आहे. तेथें वैयक्तिक मोठेपणा अगर मानापमानाच्या कल्पना बाजूसच ठेवावयास हव्यात. कारण, एखादी बँक बुडण्यानें इतर बँकांनाहि धक्का बसण्याचा संभव असतो. आमचें म्हणणें ऐवढेंच कीं महाराष्ट्रांत एकच एक बँक असावी असा आग्रह न धरतां निरनिराळ्या धोरणानें चाललेल्या पण सुरक्षित मर्यादेंत असलेल्या बँकांनीं शक्य त्या सर्व बाबतींत सहकार्य करून आपापल्या क्षेत्रांत त्यांच्या वाढीस मदत करणेंच परिणामीं श्रेयस्कर होईल.

### शॉ ह्यांचें स्मारक होत नाहीं

सुप्रसिद्ध नाटककार जॉर्ज बर्नार्ड शॉ ह्यांचें स्मारक उभारण्यासाठी ब्रिटनमध्यें एक कमिटी स्थापन करण्यांत आली होती. परंतु स्मारकनिधीला वर्गणी देण्यासंबंधीं उत्साह दिसून न आल्यामुळें, कमिटीनें स्मारक करण्याची कल्पना सोडून दिली आहे.

### लोकसंख्येसंबंधीं कांहीं मनोरंजक आंकडे

जागतिक आरोग्य संघटनेनें लोकसंख्येसंबंधीं ८० देशांतील आंकडे जमविले आहेत. त्यावरून असें दिसून येतें कीं लग्न करून प्रजा निर्माण करण्याची प्रवृत्ति जगभर वाढत आहे. २५ ते २९ वर्षे वयाच्या स्त्रियांना अधिक मुलें होत आहेत. युद्धानंतर मुलींची संख्या वाढत आहे. पण जगण्याच्या बाबतींत मात्र मुली पुढें आहेत.

### वाघाचें कृत्रिम कातडें

एक स्कॉटिश कंपनी वाघाचें कृत्रिम कातडें तयार करीत आहे. कातडयाला वाघाचें डोकेंसुद्धां बसविण्यांत येत आहे. दांत प्लॅस्टिकचे असून चमकणारे डोळेहि लावण्यांत येत आहेत.

### मूक चित्रपटांत चॅर्ली चॅपलीन

सुप्रसिद्ध विनोदी नट चॅर्ली चॅपलिन सध्या ब्रिटनमध्यें गेला आहे. एका प्रसंगीं बोलतांना त्यानें असें सांगितलें कीं मूक चित्रपटांत पुन्हा काम करण्याचा माझा विचार असून त्यासंबंधीं बऱ्याच कल्पना माझ्या डोक्यांत घोळत आहेत.

### ऑस्ट्रेलियांतील मूळचे लोक

ऑस्ट्रेलिआंत युरोपियन वसाहतवाले येण्यापूर्वी म्हणजे १७८८ च्या सुमारास त्या खंडांतील मूळच्या लोकांची संख्या ३,००,००० होती. आतां ती अवघी ४६,६४८ आहे असें समजतें. त्याशिवाय २७,१७९ लोक मिश्र रक्ताचे आहेत.

### ब्रिटनसाठीं रशिआचें धान्य

ब्रिटिश सरकारचें अन्नखातें रशिआकडून बरेंच धान्य घेण्याच्या विचारांत आहे, असें समजतें. धान्यासंबंधीं अजून करार झालेला नाहीं. पण, लंडनमधील रशिआच्या व्यापारी प्रतिनिधींशीं ह्यासंबंधीं बोलणीं चालू आहेत.

### कालप्रभावाचा परिणाम

ब्रिटनमधील सुप्रसिद्ध वृत्तपत्र दैनिक मँचेस्टर गार्डिअननें आतां पहिल्या पानावर जाहिराती छापण्याचें धोरण बदलून वृत्त छापण्यास सुरवात केली आहे. हें वृत्तपत्र १३१ वर्षांचें जुनें आहे. तेव्हांपासून चालू असलेल्या मुखपृष्ठाच्या नमुन्यांतहि बदल करण्यांत आला आहे.

### शास्त्रज्ञाची समुद्रांत बुडी

एका अमेरिकन शास्त्रज्ञानें पाणबुडे वापरतात त्या पोलादी घंटेचा उपयोग करून समुद्रांत ३,१३४ फूट पाण्याखालीं बुडी मारली. आणखी खालीं जाण्याचा त्याचा विचार होता पण टेलिफोनच्या तारा तुटल्यामुळें त्याला वर यावें लागलें. खालीं जात असतां प्रत्येक १०० फुटांवर त्यानें छायाचित्रें घेतलीं.

### टेलिव्हिजनला विरोध

'चर्च टाइम्स' ह्या प्रॉटेस्टंट पंथीय वृत्तपत्रानें टेलिव्हिजनच्या दुष्परिणामाबद्दल मत व्यक्त केलें असून इंग्लंडला ही चैन परवडणार नाहीं, असें म्हटलें आहे. टेलिव्हिजनवरील आक्षेपार्ह कार्यक्रमामुळें कुटुंबसंस्थेवर घातक परिणाम होत आहे, असें ह्या वृत्तपत्राचें मत आहे.

### हृदयाचें व फुप्फुसांचें कलम

न्यूयॉर्क येथें भरलेल्या शस्त्रविशारद डॉक्टर्सच्या परिषदेंत अशी माहिती सांगण्यांत आली कीं, सदोष हृदयांच्या लहान मुलाच्या छातींत माकडाचें हृदय आणि फुप्फुसें बसविणें लवकरच शक्य होईल. मुलाच्या हृदयांतील दोष शस्त्रक्रियेनें काढून टाकीपर्यंत माकडाचें हृदय काम करूं शकेल, असें माहिती सांगणाऱ्या सर्जनचें मत आहे.

### अणुशक्तीसाठीं मोठी प्रयोगशाळा

युरोपिअन कौन्सिल फॉर ॲटामिक रिसर्चनें असा निर्णय घेतला आहे कीं, स्वित्झरलंडमध्यें अणुशक्तिविषयक संशोधन करणारी एक प्रयोगशाळा बांधण्यांत यावी. ह्या प्रयोगशाळेसाठीं २·५ कोटी डॉलर्स म्हणजे सुमारें ९०,००,००० पौंड खर्च होतील.

### आतां विजेचें हृदय

हृदयावरील शस्त्रक्रिया चालू असतां मानवी शरीरांतील रक्ताभिसरण चालू ठेवणारा एक पंप एडिंबरो येथील दोघीं सर्जन्सनीं शोधून काढला आहे. हा पंप विजेच्या साह्यानें चालतो. ह्या शोधामुळें शस्त्रक्रिया करीत असतां हृदयाचा व रुधिराभिसरणाचा संबंध तात्पुरता तोडतां येईल व शस्त्रक्रिया करणें सुलभ जाईल असें म्हणतात.

### बर्नार्ड शॉ ह्यांचें घर

ब्रिटनमध्यें हर्टफार्ड शायरमध्यें दिवंगत नाटककार बर्नार्ड शॉ ह्यांचें घर आहे. एक ऐतिहासिक महत्त्वाची जागा म्हणून ती राखण्यांत आली होती. परंतु घर पहाण्यास इतके थोडे लोक येतात कीं त्यांनीं दिलेल्या फीमधून घराची देखरेख अशक्य होते. म्हणून आतां तें घर ट्रस्टींनीं भाड्यानें देण्याचें ठरविलें आहे.

### व्यापारी कराराचा एक नमुना

फिनलंड, रशिआ व चीन ह्या तिघांनीं मिळून १९५२ सालापुरता एक व्यापारी करार केला आहे. करारांतील शर्तींप्रमाणें फिनलंड चीनला ३·४ कोटी रुबल्स किंमतीचा माल पुरवील. त्यांत कार्ड बोर्ड व कागद ह्या वस्तू आहेत. ह्या मालाची किंमत रशिआ गहूं, तेलापासून तयार केलेल्या वस्तू, लोखंडाची मोड व मोटारी ह्यांच्या रूपानें फिनलंडला देणार आहे.

### लग्न आणि आरोग्य

लग्न करण्यापूर्वी वधूवरांची वैद्यकीय परीक्षा करण्यांत यावी असा कायदा करण्याचा इटालिअन पार्लमेंट विचार करीत आहे. विवाहेच्छु लोकांना अनुवंशानें होणारे रोग नाहींत अगर ते मानसिकदृष्ट्या विकृत नाहींत अशी खात्री करून घेण्याचा हेतु कायद्यामागें आहे. कायदा झाल्यास लोकांच्या खाजगी जीवनांत ढवळाढवळ होईल ह्या मुद्यावर कॅथॉलिक पंथीयांनीं त्याला विरोध दर्शविला आहे.

### प्रसूतिगृहाच्या चालकांचा अनुभव

मुंबईतील प्रसूतिगृहांच्या चालकांनीं जी माहिती जमविली आहे त्यावरून असें दिसून येतें कीं, मुंबईसारख्या दमट हवा असणाऱ्या शहरांतून मुली अधिक प्रमाणांत जन्माला येतात; कोरड्या हवेच्या ठिकाणीं मुलगे अधिक प्रमाणांत जन्मतात. दंपतींना आपणांस हवी त्या प्रकारची संतति होण्यासाठीं ही माहिती उपयोगी पडण्यासारखी आहे.

## दोन मोठ्या स्कॉटिश बँकांचें एकत्रीकरण

### त्यांतून सर्वांत मोठ्या स्कॉटिश बँकेची निर्मिति

बँक ऑफ स्कॉटलंड आणि युनियन बँक ऑफ स्कॉटलंड, ह्या दोन स्कॉटिश बँकांचें एकत्रीकरण होणार आहे. दोन्ही बँकांच्या डायरेक्टर बोर्डांनीं त्याप्रमाणें एकमतानें ठराव केले आहेत. बँक ऑफ स्कॉटलंड ही दोन्ही बँकांत अधिक जुनी असल्यानें, तिच्यांत युनियन बँक विलीन होणार आहे. बँक ऑफ स्कॉटलंडची जिंदगी ११·४२ कोटी पौंड असून युनियन बँकेची जिंदगी ८·७५ कोटी पौंड आहे. म्हणजे, नियोजित एकत्रित बँकेच्या ताळेबंदाची बेरीज सुमारें २० कोटी पौंड होऊन ती संस्था स्कॉटिश बँकांतील सर्वांत मोठी बँक होईल. सध्यांच्या स्कॉटिश बँकांत क्लाइडस्‌डेल अँड नॉर्थ ऑफ स्कॉटलंड ही १८·४ कोटी पौंड जिंदगीची बँक सर्वांत मोठी आहे. ही बँक म्हणजेहि त्या बँकेच्या नांवांत असलेल्या दोन बँकांची १९४९ मध्यें झालेली बँक होय.

## मुंबई राज्यांतील सार्वजनिक सुट्या ( १९५३ )

| | |
|---|---|
| वर्षारंभ | १ जानेवारी |
| प्रजासत्ताक दिन | २६ जानेवारी |
| महाशिवरात्र | १२ फेब्रुवारी |
| जमशेदी नवरोज | २१ मार्च |
| रामनवमी | २३ मार्च |
| महावीर जयंति | २७ मार्च |
| गुडफ्रायडे | ३ एप्रिल |
| स्वातंत्र्यदिन | १५ ऑगस्ट |
| बकरीद | २१ ऑगस्ट |
| नारळीपौर्णिमा | २४ ऑगस्ट |
| गोकुळअष्टमी | १ सप्टेंबर |
| पार्शी वर्षारंभ | २ सप्टेंबर |
| खुर्दादसाल | ७ सप्टेंबर |
| गणेशचतुर्थी | १२ सप्टेंबर |
| मोहरम | १९ सप्टेंबर |
| महात्मा गांधी जन्मदिन | २ ऑक्टोबर |
| दसरा | १७ ऑक्टोबर |
| दिवाळी, वर्षारंभ | ६ व ७ नोव्हेंबर |
| इद्देमिलाद | २० नोव्हेंबर |
| खिसमस डे | २५ डिसेंबर |

होळी, रमझान इद आणि संवत्सरी हे दिवस रविवारींच येत आहेत.

## मॉस्को शहर सुंदर करणार

मॉस्को शहराची गणना जगांतील सुंदर शहरांत व्हावी म्हणून रशियानें १० वर्षांचा एक कार्यक्रम आखला आहे. कार्यक्रमाच्या अंमलबजावणीस प्रारंभहि झाला आहे. ह्या कार्यक्रमाप्रमाणें मॉस्कोंत १ कोटी चौरस मीटर रहाण्याची जागा, ४०० शाळा, २६,००० खाटा असणारीं इस्पितळें, २५,००० हजार प्रेक्षक माऊ शकतील इतकीं चित्रगृहें, आणि १,००,००० लोकांच्यासाठी ग्रामीण घरें बांधण्यांत यावयाचीं आहेत. इमारतींला लागणारें सामान पुरविणारे नवीन कारखाने मॉस्कोच्या आसमंतांत खोलण्यांत आले आहेत. त्यांच्या उत्पादनाचा उपयोग करून मास्कोमध्यें दहा मजल्याच्या १७० इमारती दरवर्षी बांधण्यांत यावयाच्या आहेत. त्याशिवाय मॉस्को नदीला संगमरवरी दगडाचा घाट बांधणें, पायी चालणाऱ्यांसाठी जमिनीखालून रस्ते तयार करणें, शहराला वळसा घालणारा मोटारींचा रस्ता तयार करणें इत्यादि नवीन कामें केलीं जाणार आहेत. भूमिगत रेल्वेचे नवीन रस्ते, बागा, हिरवळी व पूल इत्यादींचाहि समावेश कार्यक्रमांत केलेला आहे. हल्ली मॉस्कोमधील ८८ टक्के कुटुंबें स्वयंपाकासाठी गॅसचा उपयोग करतात. चालू वर्षअखेर सर्व कुटुंबांना गॅस वापरण्याची सोय केली जाईल. मॉस्कोला जाणाऱ्या सर्व हमरस्त्यांच्या कडेला ५० किलोमिटर लांबीपर्यंत फळांचीं झाडें लावण्यांत येतील आणि उद्यानें तयार करण्यांत येतील.

### वाई अर्बन को. बँक लि.

वरील बँकेच्या ३ लक्ष, ९१ हजार रु. खेळत्या भांडवलापैकी शेअर्स, रिझर्व्ह फंड व इतर फंड मिळून ८५½ हजार रुपयांचें बँकेचें मालकीचें भांडवल आहे. बँकेनें १ लक्ष, ६१ हजार रु. कर्जांत गुंतवले आहेत. नियामक मंडळानें कर्जमंजुरीचे बाबतींत बरेंच सावधगिरीचें धोरण आखलें आहे, योग्यच आहे. उत्पादक कारणांपेक्षा मोडून खाण्यासाठी कर्ज घेण्याची अधिकाधिक गरज जनतेंत वाढत आहे, ह्या धोक्याकडे नियामक मंडळानें लक्ष वेधलें आहे. सहकारी दिनानिमित्त निबंध, स्पर्धा, सहकार व बँकिंग ह्या विषयांवरील पुस्तकांची लायब्ररींत वाढ, इत्यादि मार्गांनीं सहकाराची व्यापक सेवाहि बँक करीत आहे. गेल्या वर्षी बँकेस निव्वळ नफा ५,९२७ रु. झाला. ( चेअरमन : ग. व्यं. ढवळीकर. ऑ. सेक्रेटरी : रा. चिं. पावगी )

### खेळणींसुद्धां युद्धाचीं

मुलांचीं खेळणीं करणाऱ्या जर्मन कारखानदारांनीं दुसऱ्या महायुद्धांत जर्मनीनें वापरलेल्या 'व्ही टु' उडत्या बॉम्बचे खेळांतील नमुने तयार केले आहेत. दोन सळयांमध्यें हा बॉंब ठेवण्यांत येतो आणि मुलांनीं बत्ती दिल्याबरोबर तो ३०० फूट उंच उडूं शकतो.

## अवमूल्यनापासून आजपर्यंतच्या किंमतींतील चढ-उतार

( ऑगस्ट १९३९ अखेरचें वर्ष = १०० )

| गट | १७ सप्टेंबर १९४९ (अवमूल्यनापूर्वी) | २४ जून १९५० ( कोरियापूर्वी ) | १४ एप्रिल १९५१ ( कोरियन कमाल किंमतीनंतर ) | १५ मार्च १९५२ | २६ जुलै १९५२ | ३० ऑगस्ट १९५२ |
|---|---|---|---|---|---|---|
| अन्न ... | ३९२·६ | ४०७·१ | ४१४·३ | ३३५·२ | ३६६·८ | ३७३·६ |
| औद्योगिक कच्चा माल ... | ४७०·१ | ४९४·२ | ६९९·८ | ३८२·८ | ४३६·५ | ४५८·२ |
| अर्ध-पक्का माल ... | ३३४·४ | ३३५·५ | ३९०·१ | ३३९·० | ३४८·८ | ३५०·६ |
| पक्का-माल ... | ३५०·० | ३४६·९ | ४१३·१ | ३७६·६ | ३६६·४ | ३६५·९ |
| इतर ... | ५५७·८ | ६९२·४ | ७८९·१ | ६१०·८ | ६३१·६ | ६३३·३ |
| सर्वसाधारण इंडेक्स ... | ३८६·७ | ३९७·१ | ४६२·० | ३६४·९ | ३८३·४ | ३८९·१ |

## बँकांचें एकीकरण आवश्यक आहे काय ?

( लेखक :—गोविंद विठ्ठल सराफ, बी. ए., एलूएल. बी. डायरेक्टर, बेळगांव बँक लि., बेळगांव ).

बंगालमधील चार बँकांचें एकत्रीकरण घडून आल्यापासून, महाराष्ट्रांतील बँकांनीहि याच दिशेनें वाटचाल करावी, अशा सूचना कांहीं गोटांतून होऊं लागल्या. १९५० च्या जानेवारींतच त्या वेळचे मराठा चेंबरचे अध्यक्ष श्री. दांडेकर यांनीं सहामाही साधारण सभेंतील आपल्या भाषणांत अशी प्रकट सूचना केली. परंतु, लागलीच 'अर्था'नें यांतील अप्रस्तुतपणा वाचकांच्या नजरेस आणून दिला व डेक्कन बँक्स असोसिएशननेंहि याचा पाठपुरावा करण्याचें नाकारलें. आतां, अलीकडे राजस्थानांतील पूर्वीच्या संस्थानी बँकांचें एकीकरण करण्याची घटना शिजत असल्याचें पाहून, पुनः एकवार महाराष्ट्रांतील कांहीं बँकांनीं त्यांचें अनुकरण करणें इष्ट आहे, अशी प्रकट विनंति करणारा लेख महाराष्ट्र बँकेचे श्री. जोग यांनीं 'अर्था'च्या यंदांच्या दिवाळी अंकांत लिहून, त्याच्या प्रतीहि संबंधित गृहस्थांकडे पाठविल्या आहेत. यामुळें, अशी योजना अस्तित्वांत येणें आवश्यक आहे किंवा कसें, याचा सांगोपांग विचार करणें अगत्याचें झालें आहे.

### प्रगतीची सर्वसाधारण कल्पना

जीवनामध्यें आम्हीं नेहमींच पाहतों कीं, चालू स्थितींत कांहीं तरी बदल घडवून आणल्याशिवाय, आपण सुधारक किंवा प्रगतिप्रिय आहों असें आम्हांस वाटत नाहीं. आणि, पुष्कळ वेळां, केवळ आपण सुधारक आहोंत याचें प्रदर्शन करण्याच्या भावनेला बळी पडूनच, आम्हीं बदल घडवून आणीत असतों. अशा महत्त्वाच्या कामीं बऱ्याच वेळां आम्हीं परकीयांच्या भपक्याला भुलून तेथील परिस्थिति—भौगोलिक, ऐतिहासिक व सामाजिक—यांचा नीट विचार न करितां, केवळ नक्कल करूनच उत्साह दाखवूं लागतों. पुढें, अनुभवानें अशा कित्येक सुधारणा गैरसोयीच्या ठरून निरुपयोगी वाटूं लागतात व पूर्वीचीच स्थिति बरी होती अशी अंतर्यामीं तरी प्रचीति येते. याचा अर्थ, आम्हीं कोठेंहि बदल करण्याच्या विरुद्ध आहोंत असा कोणी केल्यास तो चुकीचा होईल. कित्येक वेळां पुढारलेले नागरिक, आपलें पुढारीपण बळकट करण्याचे हेतूनें, साधारण जनतेंतील स्वस्त भावना चेतवून, अनावश्यक घटना घडवून आणीत असतात. स्वदेशाची फाळणीहि त्यांना योग्य वाटूं लागते. संस्थानांचें विलीनीकरण इष्ट व आवश्यक भासवून, भाषावार प्रांतरचना तांतडीची वाटते; मग ती आर्थिक दृष्ट्या कितीहि अव्यवहार्य असो. आम्हांस एवढेंच सांगावयाचें आहे कीं, बदल घडवून आणण्यापूर्वीं तुम्ही आपला आदर्श निश्चित करा! तसें करतांना परिस्थितींचें साम्य प्रथम लक्षांत घेऊन, आपल्या इकडील संस्था, त्यांना सध्यां वाटत असलेल्या अडचणी हंगामी स्वरूपाच्या आहेत कीं दुर्लंघ्य आहेत, संस्थांचें स्थैर्य केवळ त्यांचे मोठेपणावरच आहे, कीं अन्य कांहीं बाबींवरहि अवलंबून आहे, याचा विचार होणें अत्यावश्यक आहे.

### आमचा योग्य आदर्श

बँकांच्या एकत्रीकरणाची भाषा बोलली जाते, त्यावेळीं ढोबळ मानानें इंग्लंडमधील पांच प्रमुख बँकांचें उदाहरण दाखवून, त्या राष्ट्राचा सर्व व्यवहार, त्यांनीं आपल्या कांबूंत ठेवल्याचें सांगण्यांत येतें. परंतु, तें छोटेखानी पण अत्यंत कर्तबगार राष्ट्र आहे. त्याची भौगोलिक परिस्थिति आमच्यासारखी लक्षावधी खेड्यांतून पसरलेली नाहीं, तो कृषिप्रधान देश नाहीं, तरी तेथेंहि डिस्ट्रिक्ट बँका उपयुक्त व कार्यक्षम ठरल्या आहेत, या बाबींकडे दुर्लक्ष केलेलें दिसतें. याबरोबरच अमेरिकेसारख्या प्रगतिप्रिय व आघाडीच्या राष्ट्रानें, आपली बँकिंगची आंखणी लहान लहान अशा अनेक स्थानिक बँकांमार्फत कशी उत्कृष्टपणें चालविली आहे. साधारण जनतेकरितां अनेक सोयी करून, तिचा विश्वास संपादण्यांत येतो, याचाहि विचार करणें आवश्यक आहे असें आम्हांस वाटतें. अमेरिका व भारत हीं दोन्हीं राष्ट्रें विस्तृतपणांत खंडप्राय असून शेती हा दोघांचा व्यापक व्यवसाय आहे. आमच्याकडील बऱ्याच स्थानिक बँका लहान प्रमाणांत सुरू होऊन चांगल्या वाढीस लागल्याचें दिसून येतें. मात्र आमचें बँकिंग अद्याप वरच्या व मध्यम वर्गापुरतेंच मर्यादित असून, खेड्यांतील आमजनतेस त्याचा संपर्कहि अद्याप पोंचला नसल्याचें स्पष्ट आहे. त्याच्या वाढीस अमर्याद क्षेत्र आहे. मात्र त्याचें स्वरूप या जनतेंत विश्वास निर्माण होण्याजोगें स्वाभाविक व आकर्षक केलें पाहिजे.

### कायद्याची बाजू

१९३७ सालापर्यंत, बँक अस्तित्वांत येण्यास किमान भांडवलाची अट नव्हती. यानंतर मात्र किमान पन्नास हजारांचें भांडवल जमल्याशिवाय नवीन बँक सुरू करतां येणार नाहीं, असा कायदा आहे. तो योग्य असला तरी, त्यापूर्वी केवळ मामुली भांडवलावर सुरू झालेल्या कित्येक बँका आपल्या सचोटीनें व गिऱ्हाइकांच्या सोयी करणाच्या वृत्तीनें, ठेवीदारांचा दृढ विश्वास संपादून, कोट्यावधी रुपयांचें खेळतें भांडवल जमवूं शकल्या, आणि याच्या उलट लक्षावधी रुपयांचें शेअर भांडवल जमवून, परदेशांत शाखाविस्तार करूनहि गैरव्यवस्थेमुळें १९३७ सालानंतर स्थापन झालेल्या कित्येक बँका कोलमडल्या. एक्सचेंज बँक ऑफ इंडिया अँड आफ्रिका, ए. बी. सी बँक, भारत बँक, कलकत्त्यांतील कांहीं बँका, हीं उदाहरणें अगदीं डोळ्यापुढची आहेत. व्यापाराची वृद्धि व आर्थिक संस्थांचें स्थैर्य हीं भांडवलाच्या मोठेपणापेक्षा संचालक व्यक्तींच्या सचोटीवर, सावधगिरीच्या कार्यपद्धतीवर व जनतेंत त्यांच्याबद्दल असणाऱ्या विश्वासमूलक आपुलकीच्या दृढभावनेवर अवलंबून असतात. केवळ प्रांतिक किंवा भाषिक, किंबहुना स्वदेशीच्या भावनेवर देखील आर्थिक दळणवळण अवलंबून नसतें. त्याला सद्भावना, विश्वास व गरज या त्रयींचें अधिष्ठान लागतें.

### गरज हीच आर्थिक घटनांची जननी

प्राणिजातीला जर भूक दिली नसती तर तो स्वस्थच बसला असता, आणि केवळ ही भूक भागविण्यासाठीं, बुद्धिजीवि मनुष्यानें पृथ्वीच्या पाठीवर एवढा बदल घडवून आणला! गरजेशिवाय माल खपत नाहीं, आणि माल खपल्याशिवाय उत्पादक धंदे कसे चालणार! म्हणूनच राहणीचें मान वाढवा अशी गोंडस घोषणा व प्रचार प्रमुख राष्ट्रें करीत असतात. गरजवंताला अक्कल नसते, ही म्हण किती सार्थ वाटते! सांगण्याचा मुद्दा हाच कीं, आज महाराष्ट्रांतील बँकांनीं खरोखरच एकीकरण करण्याची गरज वाटत आहे काय? वाटत असल्यास, कोणकोणत्या बँकांना? व अशा बँकांनीं दुसऱ्या कोणत्या बँकांकडे याबाबत बोलणीं चालविलीं आहेत किंवा कसें? अशा प्रकारची परिस्थिति खरोखरच कांहीं बँकांची असल्यास त्या गरजवंतांना अवश्य वाटाघाटी हार्दिक स्वरूपाच्या कराव्या, व आपापसांपुरतें एकीकरण अवश्य घडवून आणावें. यांत अडचणींत असलेल्या संस्थांचें, त्यांच्या भागीदारांचें व ठेवीदारांचें, सर्वांचेंच अंतिम

हित होणार आहे. भारत बँकेनें, पंजाब नॅशनल बँकेशीं आपला समावेश करून घेतला तो अशाच स्वरूपांत. आपत्तीमुळेंच बंगाल्यांतील चार बँकांचें एकत्रीकरण घडून आलें. राजस्थानांतहि, पूर्वीची संस्थानी सत्ता नष्ट झाल्यामुळें त्या बँकांना घोरकेपणाची स्थिति वाटत असावी. कांहीं संस्थानीं बँकांना त्यांचें येणें जमीन महसुलाचे बाकीप्रमाणें वसूल करण्याचे अधिकार होते, तर कित्येक संस्थानांतून स्टेट बँकेशिवाय दुसरी बँक स्थापणेस परवानगीच नसे. या सर्व सवलती गेल्यामुळें तेथील बँका एकत्रित होऊन मजबुतीचा प्रयत्न करीत असणें अस्वाभाविक नाहीं. परंतु, महाराष्ट्रांतील बँकांच्या बाबतींत अशी कोणतीच प्रतिकूल घटना नसतांना, या प्रदेशांतील सर्वच नव्हे, तर केवळ महाराष्ट्रीय संचालकत्वाखालील बँकांचें एकीकरण करावें असें सुचविणें हें प्रतिगामी स्वरूपाचें व अव्यवहार्य ठरणार आहे.

## प्रांतिक भावना नको

अशा स्वरूपाची प्रांतिक भावनांवर आधारलेली संस्था दुर्दैवानें अस्तित्वांत आणली गेली तर महाराष्ट्रांतल्या मारवाडी, सिंधी व गुजराथी लोकांनीं त्यांत आपला पैसा काय म्हणून ठेवावा ? व इतर व्यवहार तरी कां करावे ? महाराष्ट्र हा बोलून चालून दरिद्री प्रांत आहे. त्यांनीं केवळ प्रांतीय भावनेच्या जोरावर एकत्रीकरण घडवून आणलें तरी, श्री. जोग यांनीं दर्शविल्याप्रमाणेंच खेळतें भांडवल सर्वच मिळून दहा कोटीपर्यंत होऊं शकेल. म्हणजे ट्रायब्यूनलनें केलेल्या अ, ब, क वर्गीकरणांतहि या आमच्या मोठ्या बँकेचा दर्जा खालच्या बाजूसच राहणार. आणि आम्हां लहान माणसांच्या प्रांतिक भावनेस जर सधन असलेल्या परप्रांतीयांनीं, खुद्द पुण्यांतच बँक उघडून शह देण्याचें योजिलें तर या महाराष्ट्रीय बँकेची प्रगती होईलच अशी खात्री देतां येईल काय ? आर्थिक व्यवहार हे भावनेच्या भरापेक्षा, पैशाचे दरावर अवलंबून असतात. यापेक्षा प्रादेशिक तत्त्वावर संस्थांचें एकीकरण स्वागतार्ह ठरेल. हा फार महत्त्वाचा व दूरगामी स्वरूपाचा प्रश्न आहे. पुणें विद्यापीठामुळें मुंबईसकट महाराष्ट्राच्या मागणीला काटशह मिळाल्याचें सांगितलें जातें. बँकांबाबतच्या या सध्यांच्या सूचनेमुळेंहि आमची महाराष्ट्राची स्वाभाविक कल्पना मुंबई वगळूनच असते, असें म्हणतां येणार नाहीं काय ? आणि तशा दृष्टीनें विचार करतां तेथील बड्या बँकांच्या पुढें आमची ही मोठी बँक रोडकीच दिसणार. तरी, कोणाहि महाराष्ट्रीयानें केवळ प्रांतिक भावनेचें अधिष्ठान घेतलेली व्यापारी संस्था उभारण्याची घोषणा करूं नये अशी आमची आग्रहाची विनंती आहे. इंपीरियल बँक व खुद्द रिझर्व्ह बँक यांची व्यवस्थापद्धति प्रादेशिक स्वरूपावरच असून त्यांची संचालक मंडळेंहि त्याच तत्त्वावर नेमिलीं जातात हें सर्वांस माहीतच आहे. श्री. जोग यांनीं, या प्रदेशांतील सर्वच १८ बँकांचें एकीकरण सुचविलें असतें तर तें योग्य दिसलें असतें.

## बँकांचें एकीकरण गिऱ्हाइकांस अनिष्ट

व्यापाराची मक्तेदारी ही संस्थेच्या फायद्याची असली तरी, गिऱ्हाइकांना नकोशी असते. व्यापारांतील स्पर्धा ही केव्हांहि सर्वांनाच पोषक ठरते. त्यामुळें, सर्वत्र खुलें वातावरण खेळून, मानवी मनाच्या अनेक गुणांचा व सद्भावनांचा परिपोष होतो. याउलट, मक्तेदारी, मोठी मोठी सिंडिकेटस यामुळें व्यक्तिगत गिऱ्हाइकांची किंमत जाऊन, देणाऱ्या-घेणाऱ्यांचे परस्पर संबंध स्नेहाचे व वाढीचे रहात नाहींत. शक्य झाल्यास गिऱ्हाइकाची हा व्यवहार टाळण्याकडेच प्रवृत्ति होऊं लागते.

इंपीरियल बँकेंत जाऊन एक लाखाचा ड्राफ्ट आणणें बरें वाटतें. कारण, खुद्द एजंटाच्या चेंबरमध्यें प्रवेश होऊं शकतो. परंतु, शंभर रुपयांचा ड्राफ्ट तेथून आणण्याचा झाल्यास तासचे तास गर्दींत उभारून, मागतील तें कमिशन द्यावें लागतें. याचा या गिऱ्हाइकांस मनांतून तिटकारा वाटत असतो. असे लहान व्यवहार करण्यासाठी जर एखादी बँक त्याच्या घराजवळ झाली, तर मोठ्या खुषीनें तो ड्राफ्ट तेथें घेईलच. यापेक्षांहि जास्त, तो आपली रक्कमहि तेथें आणून ठेवून, त्याच्या मित्रांनाहि तसें करावयास लावील. त्या एजंटाशीं आपली ओळख आहे, मर्जीप्रमाणें गोष्ट ( अर्थात् योग्य असलेली ) आपण करून घेऊं शकतों, यांत त्याला अभिमान वाटून, तो त्या बँकेचा एक आधारस्तंभ होतो. अमेरिकेंत स्थानिक बँकांनीं, आपल्या गिऱ्हाइकांस मोटारींत बसूनहि व्यवहार करण्याच्या व अन्य अनेक सोयी केल्या आहेत, यांतील इंगित हेंच. माणसाला खूष केल्याशिवाय, त्याची लहर व विश्वास संपादन करितां येत नाहीं.

## योजनेचे अपेक्षित फायदे

श्री. जोग यांनीं, एकत्रीकरण घडून आल्यास, दुबार शाखा कमी करून, नवीन ठिकाणीं उघडतां येतील असें सांगितलें आहे. परंतु असा विचार करणें योग्य होईल कीं, ज्या बँकांनीं आपलें शाखाविस्ताराचें धोरण, कर्जें देण्याचें धोरण मजबुतीच्या दूरदृष्टीनें विचार न करतां आंखलेलें आहे व ज्या शाखा केव्हांहि फायदेशीर न होतां खर्चाच्या बोजास कारणीभूत होतात त्या त्यांनींच बंद करून टाकण्यास कोणती हरकत आहे ? याकरितां एकत्रीकरणाचीच आवश्यकता वाटते काय ? आणि अशा एकत्रित बँकेची एकच शाखा तेथें राहिल्यावरहि दुसऱ्या मोठ्या बँकेची शाखा येणार नाहीं कशावरून ? किंवा दुसऱ्या लहान बँका पुन: अस्तित्वांत येऊन या बँकेशीं स्पर्धा करणें हेंहि अगदीं अशक्य नाहीं. चलनवाढीच्या काळांत कांहीं बँकांनीं आपला शाखाविस्तार बेसुमार केला व कर्जेंहि वाटेल तशी देऊन ठेविलीं. त्याचे दुष्परिणाम केवळ प्रांतिक भावनेसाठीं, सावधगिरीनें व्यवहार करणाऱ्या शेजाऱ्यांनीं सोसणें आवश्यक असतें काय ? केवळ प्रांतिक संचालकत्वाखालील संस्था फायदेशीर ठरतीलच असें म्हणावें तर महाराष्ट्रांतील मुरब्बी उद्योगपतींनीं आंखलेल्या कांहीं चांगल्या योजनाहि रेंगाळतच कां पडल्या आहेत ? लेखकानें आठ शेडयूल्ड बँकांच्या ताळेबंदांतील दोन्हीं बाजूंची नुसती बेरीज करून, दहा कोटी चाळीस लाखांचें खेळतें भांडवल असलेली एक वजनदार संस्था अस्तित्वांत येऊन अनेक फायदे होऊं शकतील असें म्हटलें आहे. परंतु यापैकीं सर्वच संस्थांतून रुपयाचे अठरा आणे मिळतीलच हें श्री. जोग सांगूं शकतील काय ? त्यांच्या सूचनेंतील हा अगदीं ठळक दोष आहे. अद्यापि सर्वांच्या भागावर सारख्याच दरानें डिव्हिडंड मिळत नाहीं, हेंहि लक्षांत घेतलें पाहिजे. आम्हीं वर नमूद केलेंच आहे कीं, ज्या बँकांना आपला समावेश दुसऱ्या चांगल्या बँकेंत करून घ्यावा, असें सारखें वाटत असेल, त्यांनीं अवश्य बोलणीं करून उभयतांचें हित संपादावें. अशा वाटाघाटींत दोघांनाहि खरी परिस्थिति कळून येऊं शकेल. मात्र असें एकीकरण प्रादेशिक विचारावरचें होणें आम्हांस इष्ट वाटतें. या दृष्टीनें तूर्त खुद्द पुण्यांतल्या संस्थांपुरतांच हा प्रयत्न करून पहाण्यास कोणती हरकत आहे ?

### वाढता खर्च

एकत्रीकरणाचें एक प्रमुख कारण म्हणून, सध्यां अवार्डमुळें लादण्यांत आलेली व पुढें संभाव्य असलेली जास्त बोजाची पगारश्रेणी व इतर महागाईचा खर्च, हें दाखविण्यांत येतें. या बाबतींत असा विचार करणें आवश्यक आहे कीं, तुम्हीं आमच्या देशांतील बड्या बँकांच्या चालकांशीं थोडा वेळ जरी बोललांत, तर त्यांनाही या अवार्डच्या बोजाची व खर्चाची लहान बँकांच्या सारखीच धास्ती वाटत असते, असेंच दिसून येईल, व ती ते प्रकटपणें बोलून दाखवितात. म्हणजेच बँक मोठी झाली म्हणजे हा प्रश्न दूर होईल असें म्हणतां येत नाहीं. उलट, लहान बँकांवर पगाराचा बोजा कितपत बसविणें इष्ट ठरेल याचा केव्हांही सरकारला व्यावहारिक दृष्ट्या दूरवर विचार करावा लागेल. मंदीच्या काळांत पगारांत काट करावीच लागेल. शिवाय ही परिस्थिति सर्वांनाच कायद्यानें लागू होत असल्यामुळें, कोणा एकालाच सवलत राहणार नाहीं, व हा खर्च गिऱ्हाइकांवर आपोआपच बसविला जाईल. पगारश्रेणीचा हा प्रश्न राष्ट्रीय स्वरुपाचा आहे. एकीकरणामुळें मात्र सध्या विविध स्थानिक बँकांमुळें उपलब्ध असलेली नोकरीची सोय बरीच कमी होईल. लेखकानें सध्याचा सर्वच नोकरवर्ग ठेवला जाईल असें जाहीर आश्वासन दिलें, तरी तें निश्चित अव्यवहार्य ठरणार आहे आणि खर्च कमी होण्याच्या शक्यतेस सर्वच नोकरवर्ग चालूं ठेवणें ही स्थिति विसंगत वाटते. ठेवींच्या बाबतींत सध्यां बँकांना खरी स्पर्धा सरकारी बचत योजनांची व औद्योगिक कंपन्यांकडून होत आहे इकडे दुर्लक्ष करतां येणार नाहीं. एकत्रित झालेली बँक जास्त मजबूत होऊन जास्त फायदा मिळवूं शकेल अशी शक्यता वाटली तरी त्याबरोबरच गैरव्यवस्था होऊन किंवा इतर कांहीं प्रतिकूल घटनांमुळें नुकसानीही मोठ्याच प्रमाणांत होण्याचा संभव असतोच. आणि अशा वेळीं मात्र वेगळ्या संस्थांमुळें सर्वच महाराष्ट्रीयांना एकदम नुकसानी सोसण्याचा दुर्दैवी प्रसंग टळेल. मोठ्या रकमेचा विमा केव्हांही एकच कंपनी न घेतां, धोक्याची वांटणी करण्याची पद्धत अवलंबितात हेंच योग्य.

### रिझर्व बँक

समाधानाची एकच गोष्ट म्हणजे सरकारनें सध्यां रिझर्व्ह बँकेमार्फत सर्व बँकांची कडक तपासणी करवून, त्यांची कार्यपद्धति सुधारण्यासाठीं, जरूर तें मार्गदर्शन करण्याची योजना अंमलांत आणली आहे. यापुढें रिझर्व्ह बँकेच्या शिफारशीशिवाय कोणत्याहि बँकेच्या भांडवलवाढीस किंवा नवीन शाखा उघडण्यास परवानगी मिळत नाहीं. गैरव्यवस्था उघडकीस आल्यास ठेवी घेण्याचें बंद करविण्याचा अधिकार तिला असून, तो कसोशीनें पाळला जात आहे. याचीं अनेक उदाहरणें देतां येतील. तरी आम्हांस निःसंदिग्धपणें असें सांगावेसें वाटतें कीं, सध्यां आहे तीच स्थिति चालू ठेवून जगा व जगूं द्या (Live and let live) या धोरणानेंच सर्वांनीं वागणें योग्य ठरणार आहे. आमचें बँकिंग अद्याप व्यवस्थितपणें आंखण्यांत आलेलें नाहीं. त्यामुळें कांहीं थोड्याच शहरांत व विभागांत बँकांची गर्दी झालेली दिसते. अद्याप कित्येक लहान–मोठ्या शहरांतून बँकांचे क्षेत्रवाढीस वाव आहे. खेड्यांमधूनहि व्यवस्थित कार्य होणें आवश्यक आहेच. रूरल बँकिंग इन्क्वायरी कमेटीच्या रिपोर्टाप्रमाणें रिझर्व बँकेनें या दिशेनें प्रत्यक्ष कार्याची आतां सुरुवात केलेली आहे. स्थानिक बँका या मोठ्या शहरांतच फायद्याच्या खोट्या आशेला लागून फुकट परिश्रम करतात, असें दिसून येतें. त्याच जर आपल्या कुवतीप्रमाणें तालुक्याच्या व व्यापाराची उत्तम केंद्रें असलेल्या लहान शहरांतून गेल्यास जनतेकडून त्यांचें स्वागत उत्साहानें होऊन आत्मविश्वास वाढीस लागतो, हें आम्ही स्वानुभवानें सांगूं शकतो. मोठ्या स्वरुपाच्या, केवळ 'दर्जा' कडे दृष्टी देणाऱ्या बँका लहान ठिकाणीं कुचकामी ठरतात. सध्यां अस्तित्वांत असलेल्या विविध संस्थांनीं आपली कार्यपद्धति पुनः पुनः तपासून, तींतील दोष काढून टाकण्याचा निश्चय करावा व रिझर्व्ह बँकेकडून जो एकसूत्रीपणा आणण्याचा उदात्त प्रयत्न होत आहे, त्यांत हार्दिक सहकार्य करीत राहिल्यास सर्वांचाच जास्त फायदा होत राहील, असें आम्हीं निश्चितपणें सांगूं इच्छितों.

### व्यावहारिक दृष्टिकोन

अशा योजनेपेक्षा खरोखरच जर सहकार्याची भावना व प्रगतीची तळमळ आमच्यांत वावरत असेल, तर येथील सर्व बँकांच्या कार्याचें डेक्कन बँक्स असोसिएशनमार्फत सूत्रीकरण करून तें एकमेकांस पूरक होईल अशा स्वरूपाचें करणें योग्य होणार नाहीं काय ?

सर्व बाबींचे किमान दर ठरवून ते निश्चितपणें पाळले जावे. ज्या बँकांच्या शाखा तोट्यांत किंवा मामुली फायद्यांत असतील त्यांना त्या बंद करण्याचा सल्ला देऊन, जेथें क्षेत्र मोकळें आहे तेथें उघडाव्यात, व असोसिएशनच्या मान्यतेशिवाय दुसऱ्या सभासद–संस्थेनें तेथें शाखा उघडूं नये. लहान बँकांच्या व मोठ्यांच्या बाबतींतहि कॉर्पोरेशन टॅक्सचे व इन्कमटॅक्सचे दर एकच आहेत. ते पहिल्यांच्या बाबतींत थोडें सवलतीचे करण्याबाबत एकमुखी जोराची मागणी करावी. केवळ गिऱ्हाईक मिळविण्यासाठीं, एकमेकांत दराची कुतरओढ करण्याचें सोडून देऊन गरजू बँकांनाच थोडा सवलतीचा दर ठरवावा. जिल्हा व तालुक्याचीं ठिकाणें फक्त स्थानिक बँकांनाच मोकळीं राखून, बड्या बँकांच्या शाखांना तेथें बंदी असावी अशी मागणी करतां येईल. याहि पुढें जाऊन, इंपीरियल बँकेच्या जिल्हानिहाय ज्या शाखा आहेत त्याच रिझर्व बँकेच्या प्रतिनिधी म्हणून असाव्या व त्यांनीं त्या जिल्ह्यांतील फक्त बँकांनाच जरूर तो पैसा योग्य दरानें पुरवावा अशीहि सोय सरकारकडून करून घेतां येईल. अशाच दिशेनें पावलें टाकणें सर्वांस श्रेयस्कर होणार आहे.

### परिस्थितीप्रमाणें पद्धतींत बदल हवा

रूरल बँकिंग इन्क्वायरी कमेटीपुढील दिलेल्या त्यांच्या साक्षींत खुद्द श्री. जोग म्हणतात कीं, इंग्लंडप्रमाणें येथेंहि बँकिंगची मोनॉपली किंवा मक्तेदारी सरकारनें होऊं देऊं नये. आणि कांहीं निवडक बड्या व्यापारी बँकांनाच सरकारनें खेडेगांवीं शाखा विस्ताराची सवलत दिली तर त्याचा इतरांवर अनिष्ट परिणाम होईलच. अशाच तऱ्हेच्या मक्तेदारी बँकिंगचा प्रसार सरकारला करावयाचा आहे काय असा स्पष्ट सवाल विचारून ते म्हणतात कीं, त्यापेक्षा हें काम सरकारनें त्या प्रदेशांतील स्थानिक बँकांना द्यावें. तेथील हितसंबंधाशीं परिचय असलेल्या बँका तें काम अधिक चांगल्या रीतीनें करूं शकतील. (८ फेब्रुवारी १९५० चे 'अर्थां'वरून.) हें मत इतक्यांत बदलण्यास त्यांना जीं कांहीं कारणें असतील, त्यांपैकी मुख्य म्हणजे या अवधींत ते इंग्लंडची फेरी करून आले आहेत. सुरवातीलाच सुधारणेच्या कल्पनेची मीमांसा करतांना आम्हीं म्हटलें आहे कीं, कांहीं वेळां परकीयांच्या भपक्यामुळें मन भारून जातें! आम्हीं श्री. जोग

यांना निरनिराळ्या एवढीच सूचना करितों कीं, त्यांनीं एक वेळ अमेरिका व कॅनडा या देशांतील बँकिंगच्या संस्था व आणखीहि कांहीं देश—जपानसारखे—पाहून येऊन तौलनिक दृष्ट्या विचार करून निर्णय घ्यावा. आम्हीं मात्र त्यांच्या येथील अनुभवजन्य पूर्वींच्या मताशींच सहमत आहों.

रिझर्व्ह बँकेनेंहि आपल्या यंदाच्या रिपोर्टांत पान २४ वरील पॅरा ३५ यांत नमूद केलें आहे कीं:—

In no other sphere perhaps as in that of rural finance is it of so little use, in Indian conditions to turn for guidance to the central banking practices evolved in the highly industrialised countries of Western Europe. In this matter, as in the extension of banking facilities generally, fresh approach had to be thought out; and it was in order that the lines laid down might be sound and well considered that, at the suggestion of the Reserve Bank, the Government of India appointed The Rural Banking inquiry Committee (1949-50).

यावरून पश्चिम युरोपांतील औद्योगिक दृष्ट्या पुढारलेल्या प्रदेशांतील बँकिंगची पद्धति इकडे सरसहा लागू पडत नसल्याचें स्पष्ट दिसून येत नाहीं काय?

### "लहान आकार हा दोष नव्हे"

या बऱ्याच लांबलेल्या लेखाचा समारोप, आम्हीं श्री. जोग यांनीं स्वीकारलेल्या एकीकरणाच्या अध्वर्यूंच्या शब्दांतच करूं इच्छितों. कारण ते उद्गार कोणासहि पटण्याजोगे आहेत. युनायटेड बँक ऑफ इंडिया या बंगालमधील एकत्रित झालेल्या चार बँकांपैकी, कोमिल्ला बँकिंग कॉर्पोरेशन या अकरा कोटींच्या ठेवी असलेल्या सर्वांत मोठ्या बँकेचे चेअरमन श्री. एन्. सी. दत्त, एकत्रीकरण होण्यापूर्वींच्या त्यांच्या बँकेच्या अखेरच्या सभेपुढें म्हणाले, "एकत्रित होणाऱ्या बँकेस मी सुयश चिंतितों. याबरोबरच स्वतंत्रपणें व्यवसाय करणाऱ्या इतर अनेक बंगाली बँकांचीहि अखंड प्रगति होवो असें मी इच्छितों. लहान आकार असणें हा दोष नसून, व्यवसाय समाजाच्या, किंवा प्रत्यक्ष संस्थेच्या हितास बाधक करणें हा दोष होतो. तरी बंगाली बँकिंगचा व्यवसाय समाजाच्या हितास पोषक होवो!"

बँकिंगच्या यशस्वितेचें मुख्य सूत्रच त्यांनीं यांत ग्रथित केलें आहे. एवढेंच सांगून आम्हीं सर्वांची तूर्त रजा घेतों.


# पुणें बँकिंग असोसिएशन, पुणें

(१६१, बुधवार, पुणें २)

### व्याख्यानें व प्रदर्शन

या असोसिएशन मार्फत चालू वर्षीं नोव्हेंबर महिन्याचे शेवटचे आठवड्यांत बँकिंग क्षेत्रांतील तज्ज्ञ मंडळींचीं दोन व्याख्यानें करावींत अशी चालक मंडळींनीं एक योजना आखली आहे. त्यांपैकीं एक व्याख्यान रिझर्व बँकेचे एखादे वरिष्ठ अधिकारी व दुसरें व्याख्यान बँकिंग क्षेत्रांतील तज्ज्ञाचें होईल. तसेंच यावेळीं 'बँकिंग' विषयास अनुरूप असें एक छोटेसें प्रदर्शन करावें, अशीहि चालकांनीं योजना आखलेली आहे.

'बँकिंग' विषयासंबंधीं 'प्रदर्शन' ही एक अभिनव योजना असून त्याची स्थूलतः कल्पना खालीलप्रमाणें आहे. निरनिराळ्या बँकांचे चेक, ड्राफ्ट, हुंडी, जाहिरातींचे नमुने, वगैरे एकत्रित आणवून त्यांची कलात्मक दृष्टीनें मांडणी करून दाखविणें त्याचप्रमाणें, जॉइंट स्टॉक बँकिंग व सहकारी बँकिंग यांचे निरनिराळ्या दृष्टीनें मुद्दाम तयार केलेले आकर्षक व माहितीपूर्ण ग्राफ तयार करवून त्यांचें प्रदर्शन करणें. तसेंच यावेळीं बँकिंग विषयास अनुलक्षून असलेल्या जुन्या ऐतिहासिक वस्तूंचें, विविध हुंड्या नाणीं, लेख यांचेंही प्रदर्शन केलें जाईल.

याबाबत होणारे सर्व कार्यक्रम व प्रदर्शन बँकांतील सर्व नोकरवर्गाला व जनतेस खुलें ठेवण्याचा मानस आहे. त्यामुळें बँकिंगसंबंधीं समाजामध्यें इष्ट तो ज्ञानाचा प्रसार व्हावा व ही प्रवृत्ति समाजामध्यें फैलावून बँकिंग क्षेत्रांत काम करीत असलेल्या मंडळींना, जनतेला व शेवटीं आपलें राष्ट्र औद्योगिक दृष्ट्या समृद्ध व्हावयास मदत व्हावी हीच उत्कट आशा आहे.

### सहकार्याची विनंति

या योजनेकरितां सर्व बँकांनीं आपलेकडील चेक, ड्राफ्ट, हुंडी, वगैरेंचे एक एक नमुन्याचा फॉर्म आमच्याकडे पाठवावा अशी नम्र विनंति आहे. तसेंच आतांपर्यंत आपण केलेल्या आपले दृष्टीनें ज्या आकर्षक जाहिराती असतील त्याचींही कात्रणें पाठवावींत. वरील प्रकारें सहाय्य आपलेकडून जेवढें होईल त्या प्रमाणावर ह्या योजनेचें यश अवलंबून आहे. तसेंच वरील कार्यक्रमाचे वेळीं आपले बँकेतर्फे आपण स्वतः अगर आपले प्रतिनिधीमार्फत उपस्थित होऊन आम्हीं करीत असलेल्या कार्यांत, समक्ष सहभागी व्हावें अशीही नम्र विनंति आहे. याबाबत आपल्या कांहीं मौलिक सूचना पाठविल्यासहि आम्हीं फार आभारी होऊं.

सोमवार ता. १ डिसेंबर १९५२ रोजीं ईद–मिलादची सार्वजनिक सुट्टी असल्यानें वरील कार्यक्रम रविवार व सोमवार ता ३०–११–५२ व ता. १–१२–५२ रोजीं करावेत, अशी कल्पना आहे. याबाबत कार्यक्रमाची नक्की तारीख व तपशीलवार योजना मागाहून आपणांस कळवूं.

आपले नम्र,

पुणें बँकिंग असोसिएशन तर्फे

पुणें २
२७ ऑक्टोबर, १९५२

सी. व्ही. जोग (बँक ऑफ महाराष्ट्र)
बी. बी. पुरोहित (सेंट्रल बँक ऑफ इंडिया)
डी. एन. गांडेकर (न्यू सिटिझन बँक ऑफ इंडिया)

कमेटीचे सभासद


हें पत्र पुणें, पेठ शिवाजीनगर घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए. यांनीं 'दुर्गाधिवास', ८२३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.